I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 390-395

A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCESS

e-ISSN 2347 – 517X

Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# बिलदर व्यक्तिमत्व– डॉ. प्रकाश बाबा आमटे

संजय उत्तमराव उगेमुगे व प्रकाश.आर.शेंडे

चिंतामणी महाविद्यालय पोंभुर्णा जि.चंद्रपूर

सरदार पटेल कॉलेज, चंद्रपूर

*Corresponding Author: sanjayugemuge80@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 | Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :–**

जेव्हा आदिवासींचे संपूर्ण जीवन अंधकारमय झालले होते. तेव्हा सुर्यरुपी प्रकाशाची ज्योत हातात घेवून संपूर्ण माडिया आदिवासीचे जीवन उजाळून टाकण्याच्या जणू काही विडाच घेतला होता. जीवनातज्याप्रमाणे दिन दलितांच्या जीवनात महात्मा फुले आणि डॉ. बाबा साहेब आंबेडकरांनी ज्ञानाच्या प्रकाश आणून त्यांचे संपूर्ण जीवनच प्रकाशमय केले. त्यांचप्रमाणे गडचिरोली जिल्हातील भामरागड तालूक्यात अति मागासलेली जमात म्हणजे माडिया होय. या माडिया आदिवासीच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश आणण्याचे महत्वपूर्ण कार्य, डॉ. प्रकाश बाबा आमटे यांनी केलेले आहे. त्यांच्यामधिल असलेल्या अशिक्षीतपणा, मागासलेपण,कुपोषण,आरोग्य याबाबत त्यांना जागृत करण्याचे महत्वपूण कार्य डॉ. प्रकाश बाबा आमटे यांनी केलेले आहे. आपल्या सुखी जीवनाच्या त्याग करूण आल्या ऐंशोआरामाला लाथ मारून आपले संपूर्ण आयुष्य माडिया आदिवासीच्या जीवणाच्या उत्थानासाठी खर्ची घातले. माडिया अदिवासींनी आपल्याला स्विकारावे यासाठी त्यांनी स्वत:ला बदलविले , डॉ. प्रकाश बाबा आमटे हे माडिया आदिवासी संस्कृतीशी समरस झाले. त्यांनी आपल्याला स्विकारावे यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. त्यांच्या प्रयत्नांना यश आले, माडिया आदिवासी आता सुधारले दिसत आहे.शिक्षण घेतलेला माडिया आदिवासी तरूण जेव्हा बस कंन्डॉक्टर जेव्हा तिकिटीचे पैसे देवून सुध्दा टिकीट देत नाही. तेव्हा आदिवासी त्यांना पकडून हेमलकसाला आणतो .तेव्हा असे समजून जावे की आदिवासी आपल्या हक्काबददल जागृत झालेले दिसून येते . आज अनेक नवीन तरूण तरुणी नोकरी करीत आहे. याचे समाधान डॉ. प्रकाश बाबा आमटे यांना वाटते.

**बीजसंज्ञा :–** डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या माडिया आदिवासी जमातीसाठी केलेले सामाजिक कार्य उलगडून दाखविणे.

## प्रस्तावना :–

रामाने आपल्या वडिलांना ज्याप्रमाणे अभिवचन १४ वर्षा करीता पाळले. परंतु प्रकाश बाबा आमटेंनी आपल्या वडिलाला दिलेला शब्द आजतागायत पाळत आहे. त्यांनी शुन्यातुनच सर्व उभे केले.किडयांनी बुजबुलेल्या महारोग्यांच्या जीवनात बाबा आमटेनी आनंद निर्माण केल्यानंतर ,या अजिक्य योद्धाचे पाय हेमलकसाकडे वळले. बाबा आमटे यांच्या डोक्यांत निरनिराळया कल्पना येत असे आणि त्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचे बळ, सामर्थ्य त्यांच्या मध्ये होते. त्यांनी अनेक योजना अमंलात आणल्या होत्या .एकदा वयाच्या १४ व्या वर्षी शिकारीच्या निमित्ताने ते भामरागडला आले होते. माडिया आदिवासींची अतिशय बिकट परीस्थिती बघूनत्यांचे मन हेलावून गेले. तेव्हा त्यांना अतिशय वाईट वाटले . यांच्यासाठी काहीतरी केले पाहीजे. ही प्रगल्भ ईच्छा बाबा आमटे यांच्या मनात होती ही ईच्छा उराशी बाळगून १९७० च्या दशकांत त्यांनी आपल्या काही निवडक कार्यकर्त्यासह व आपल्या मुलांसह भामरागडला आले. त्यांनी या ठिकांणी तीन दिवस घालविले यात

त्यांनी संपूर्ण माडिया आदिवासींच्या परीसर पायाखाली घातला तर त्यांना आश्चर्य वाटले की,येथिल माडिया आदिवासीं माणसांना बघून घनदाट जगलात पळून जातात. येथिल कमालीची दरिद्रता, कुपोषण, अनेक रोगांनी बरबरटलेले आदिवासी ,अन्नासाठी तडफणारे,अर्धनग्न येथिल आदिवासी,हया सगळया गोष्टी मनाला सुन्न करणाऱ्या होत्या. येथिल आदिवासी धडधाकट असून जनावराप्रमाणे आपले आयुष्य जगतात . त्यांना माणसात आणणे फार महत्वाचे आहे. यासाठी काहीतरी केले पाहिजे. या उद्देशांनी त्यांनी यानंतर मी माडिया आदिवासींसाठी काम करेल हे बाबांनी बोलून दाखविले. परंतु त्यांचे वय बघता हे काम मी करेल अशी भूमिका डॉ. प्रकाश बाबा आमटे यांनी घेतली .त्यासाठी त्यांनी २३ डिसेंबर १९७३ रोजी लोकबिरादरी प्रकल्पाची स्थापना माडिया आदिवासींच्या उत्थांनासाठी व कल्याणासाठी करण्यात आली.

उद्देश :-

१) माडिया आदिवासींना आधुनिक जगाशी समरस करणे.

२) माडिया आदिवासींना शिक्षणाबाबत जागृत करणे.

३) माडिया आदिवासींना मुख्य प्रवाहात आणणे.

४) माडिया आदिवासींमधिल अंधश्रद्धा नष्ट करणे.

५) माडिया आदिवासींना आपल्या आरोग्याबाबत जागृत करणे.

६) माडिया आदिवासींना आधुनिक शेतीसंबधी ज्ञान देऊन त्याबाबत जागृत करणे.

७) माडिया आदिवासींना आधुनिक बी, बियाणे देऊन त्यांची उत्पादकता वाढविणे

८) माडिया आदिवासींना आपल्या अधिकाराबाबत जागृत करणे

९) माडिया आदिवासींचे शोषण कसे केले जाते त्याबाबत त्यांना जागृत करणे

१०) माडिया आदिवासींना विविध सरकारी योजनाची माहिती देऊन त्यांना त्याबाबत सजग करणे.

**डॉ. प्रकाश बाबा आमटे यांचे आरोग्य विषयक कार्य : –**

२३ डिसेंबर १९७३ ला खऱ्या अर्थाने लोकबिरादरी प्रकल्पाची सुरवात झाली.अति मगासलेल्या या अदिवासीमध्ये अनेक आरोग्य विषयक समस्या निर्माण झालेल्या होत्या. त्यामुळे या माडिया आदिवासीमध्ये मृत्यूदर हा फार मोठया प्रमाणात होता. हा मृत्यूदर कमी करण्यासाठी डॉ. प्रकाश बाबा आमटे यांनी प्रयत्न केले त्यांना आरोग्याबाबत जागृत केले. त्यांनी माडियांना मोफत उपचार द्यायला सुरवात केली. त्या_ठिकांणी सर्वात मोठी समस्या ही भाषेची होती त्यासाठी तेथिल वनरक्षक पटवारी असेच काही सरकारी अधिकारी यांच्यासोबत संपर्क साधून त्यांच्या कडून काही प्रमाणात माडिया

भाषा शिकायला सुरवात केली. त्यांनी सर्वप्रथम आपला माडिया कोष तयार करून त्यांनी माडिया भाषेत बोलायला सुरवात केल्यांनंतरच माडिया लोकांच्या डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्यावर विश्वास बसला त्यानंतर त्यांनी आपले कार्य करायला सुरवात केली. या ठिकंणी घनदाट जंगलच असल्यामुळे, या ठिकांणी मोठया प्रमाणात सेलिब्रल मलेरियाची साथ राहत होती. आणि शेकडो आदिवासी त्यामध्ये मरण पावत होते. हा मृत्यूदर कमी करण्यासाठी मोठया प्रमाणात डॉ. प्रकाश आमटे आणि त्यांच्या सहकार्यानी प्रयत्न केले. ते त्यामध्ये मोठया प्रमाणात यशस्वी झाले. कोणी हाडे मोडलेली मानसे येत होती त्यांचे दु:ख वेदना कमी करण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली. माडिया आदिवासीवर मोठया प्रमाणात अस्वलाचे हल्ले, वा वाघाच्या हल्यांनी रक्तबंबाळ झालेले, तर साप चावल्याच्या अनेक पेंशन्ट येत असे या माडियांना प्रयत्नांची पराकाष्ठा करून माडिया आदिवासीचे जीव वाचविले. तेव्हा कुठे माडिया आदिवासीच्या विश्वास प्रकाश भाऊवर बसला. त्यानंतर माडिया दररोज नित्यनेमाने उपचारासाठी यायला सुरवात झाली.माडिया आदिवासींना त्यापासून कोणत्या प्रकारे त्याला वाचविता येईल हा फार मोठया महत्वाचा मुद्दा होता. डॉ प्रकाश आमटे फिजिशियन असूनसुद्धा त्यांना अनेक रोगांनवर उपचार करावा लागत. कारण ती त्यावेळची गरज होती. दात काढणे. नाकामध्ये गेलेल्या वस्तुबाहेर काढणे डोळयांनवर उपचार करणे मोडलेले हाडे जुळविणे अशा अनेक गोष्टी डॉ. प्रकाश आमटेना कराव्या लागत. त्यामुळे आदिवासीवर अनेक उपचार करणारे एकमेव डॉक्टर म्हणजे डॉ. प्रकाशभाऊ होय.

**आदिवासींच्या समस्या :-**

आदिवासींच्या अनेक समस्या होत्या .त्या एक नाही तर अनेक अशा गोष्टी होत्या. त्या सोडविल्या शिवाय त्यांना न्याय मिळणार नव्हता. उदा. वनअधिकारी त्यांच्याकडून कामे करून घेत पण त्यांच्या परीश्रमांच्या मोबदला त्यांना अजिबात देत नव्हते. त्यामुळे माडिया आदिवासींचे फार मोठया प्रमाणात शोषण होत होते. त्यांनी चालविलेली मक्तदारी ही डॉ प्रकाश आमटेनी मोडून काढलेली होती. त्यासाठी त्यांनी माडिया आदिवासींवर अन्यायाविरूद्ध रणशिंग फुकले त्या काळात त्या क्षेत्रात डॉ. प्रकाश आमटेंना मानणारे फार मोठे माणसे होती. त्यांच्या शब्दाला त्याठिकांणी मान सम्मान होता. हा मान सम्मान मोठया प्रमाणात असल्यामुळे मोठे अधिकारी आदिवासींवर अन्याय करायला घाबरत होते. त्यांना मिळणारा मोबदला आता निसंकोचपणे प्राप्त होत होता.

त्यांना मिळत असलेल्या अनेक सरकारी योजना माडिया आदिवासींपर्यत पोहचत नव्हत्या, त्या योजना मधला अधिकारी वर्ग

खाऊन टाकीत होता. त्यामुळे संपूर्ण माडिया आदिवासी योजनांनपासून वचींत होता. सरकारी योजना माडिया आदिवासींपर्यत पोहचाव्यात हयासाठी संपूर्ण हेमलकसातील कार्यकर्त्यांना त्यासाठी प्रयत्न केला. त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले .माडिया आदिवासींना मिळणाऱ्या योजना जेव्हा आदिवासी मिळत होत्या.तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद व्दिगुणीत झाल्यासारखा वाटत होता. त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळे तेज व समाधान दिसत होते. आदिवासींची मध्ये अनेक अंधश्रद्धा होत्या त्यामुळे ,ते जमीनीला अजिबात नागरत नव्हते. तिची मशागत करीत नव्हते.ते जमीनीला माता समजत असे, अशाप्रकारची फार मोठी अंधश्रद्धा त्यांच्यामध्ये होती. हि अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी डॉ. प्रकाश आमटेच्या कार्येकर्त्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा करीत माडिया आदिवासीना नविन शेतीचे ज्ञान द्यायला सुरवात केली. त्यांनी शेती कशी करायचे यांचे आधुनिक ज्ञान द्यायला सुवात केली. त्यांच्या या प्रयत्ना फार मोठे यश मिळाले. हे डॉ प्रकाश आमटेच्या यशाचे गमक मानावे लागेल. आता माडिया आदिवासी मोठ्याप्रमाणात निरनिराळ्या अन्यधान्याची निर्मिती करतात.ते आता स्वंयपूर्ण झालेले पाहुन डॉ.प्रकाशभाऊंना वेगळे समाधान प्राप्त झाल्याचे दिसून येते. आतापर्यत माडिया आदिवासी दिवसरात्र अन्त्रासाठी भटकत होते. आता माडिया आदिवासी स्वंयपूर्ण झाले याचे श्रेय लोकबिरादरी प्रकल्पालाच जाते.त्यांनी केलेले आदिवासीसाठी हे मोठे कार्य इतिहासाला विसरता येणारे नाही

माडिया आदिवासींमध्ये अनेक वाद विवाद होत असत. छोटे मोठे वाद विवाद हे गावातील पंचायत करीत असत .पण काही लोकांच्या जर त्यांच्या न्यादानावर जर विश्वास बसला नाही तर हे गावकरी डॉ प्रकाश आमटेंकडे येत असत.कारण प्रकाशभाऊवर त्यांच्या जास्त विश्वास होता. डॉ प्रकाश आमटेकडे माडिया आदिवासी आल्यांनतर त्यांच्या घरांच्या अंगनामध्येच लोकअदालत भरत असत. दोघांची बाजू एकूण घेतल्या नंतर ते न्यायदान करीत असत.त्यांच्या न्यायदानावर या माडिया आदिवासींच्या फार मोठा विश्वस असल्यामुळे माडिया आदिवासी न्यायासाठी लोकबिरादरी प्रकल्पात येत होते. त्यांनी केले हे कार्य कदाचित इतिहासात एकमेव आहे. प्रकाशभाऊहे कोणत्याही मोहाला वा आमिषाला बळी न पडता माडिया आदिवासींचे तंटे सोडविण्याचा प्रयत्न करीत आणि त्यात ते यशस्वी सुद्धा झाले.

**लोकबिरादरी प्रकल्पाची शैक्षणिक जागृती :**

माडिया आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना सुशिक्षीत करणे हे फार महत्वाचे कार्य होते. त्यांना अन्यायाविद्ध लढण्याची शक्ती निर्माण व्हावी. या साठी त्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा करून सन

१९७६ ला शाळा उघडली आणि माडिया आदिवासींसाठी शिक्षणाची दारे खुली केली. अशाप्रकारे माडिया आदिवाच्या जीवनात ज्ञानाची दारे खुली झाल्यामुळे माडिया आदिवासींची मुले आज डॉक्टर, इंजिनिअर,वकिल, शिक्षक, वनरक्षक, पोलिस, पटवारी बनतांना दिसत आहे याचे वेगळे समाधान डॉ. प्रकाशभाऊंना वाटत असते. हया सगळया गोष्टी लोकबिरादरी प्रकल्पाच्या माध्यमांतून होत असते.

**निष्कर्ष** :

काही काळानंतरच एका महापुरुषांच्या जन्म होतो. त्यामध्ये डॉ प्रकाश आमटे हे एकमेव व्यक्तिमत्व होय. यांनी स्वत:च्या जीवनाला दु:खामध्ये टाकून माडिया आदिवासींचे कार्य हाती घेतले. महाभारतामध्ये कुंतीचे उदाहरण आहे की, त्यांनी श्रीकृष्णाला फक्त दु:ख मागीतले होते. तसाच प्रकारे हा भाग संपूर्ण जंगलमय असल्यामुळे या ठिकांणी सोयी सुविधांच्या मोठया प्रमाणात अभाव असल्यामुळे अनेक समस्या आवासून उभ्या होत्या. या भागात जाणे म्हणजे खऱ्या अर्थाने आजीवन वनवास होता. रामाने आपल्या वडिल्याच्या आज्ञेने १४ वर्ष वनवास भेगला. परंतु डॉ प्रकाश आमटेनी आपल्या वडिलांना शब्द देवून आजीवन वनवास आजतागत भोगत आहे .पण त्यांची याबाबत कधीच वडिलांनकडे तक्रार केली नाही. त्यांना माडिया आदिवासींचे दु:ख दुर करण्यात जो आनंद मिळतो तो आनंद स्वर्गाहुन फार मोठा आहे. असे डॉ प्रकाश आमटे म्हणतात. आपल्या तक्रारी आपणच सोडवाव्यात यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात .प्रत्यक्ष नियतीने व निसर्गाने डॉ प्रकाश आमटेना साथ दिली. त्यांना अनेक गोष्टी हेमलकशानी शिकविल्या. लोक म्हणतात डॉ प्रकाश आमटेंच्या हातामध्ये जादू आहे .ही खरच आजही ती जादू कायम स्वरुपाची आहे.आताही जी शस्त्रक्रिया मुलांना जमत नाही ती शस्त्रक्रिया अनुभवाच्या आधारावर अतिशय शिताफिने सहज करीत असतात. त्यांच्या कलागुणाना तोड नाही. त्यांनी आपला रीकामा वेळ रेडिओ दुरस्ती, ट्राझिस्टर दुरस्ती, घडयाळ दुरस्ती, जुना कुजलेल्या नोटा बदलून देणे. हया सगळया गोष्टींवर घालविला. डॉ प्रकाश आमटेनी हा एक छंद म्हणून केला. हया सर्व गोष्टी करीत असतांना वेगळा आनंद त्यांना मिळत असे आता तर माडिया आदिवासीठी अनेक बारीक सारीक कामेसुद्धा लोकबिरादरी प्रकल्पच करीत असतात यावर त्यांच्या विश्वास बसला.

काही लोकांना प्रशिक्षण देवून हॉडपंप दुरस्तीसाठी कार्येकर्त्यांची वेगळी टिम तयार करूण माडिया आदिवासींच्या पाण्याची समस्या सोडविण्यात त्यांना यश आले.कारण त्यांना पाण्यापासून नानाविधी रोग जडलेले असत. त्यासाठी त्यांनी मोलाचा वाटा उचलेला होता. आज विश्वामध्ये लोकबिरादरी प्रकल्पाची ओळख आहे, ती

केवळ डॉ. प्रकाश आमटेच्या लोकबिरादरी प्रकल्पामुळेच होय. त्यांचे कार्य हे इतिहासाला प्रेरणा देणारे आहे. त्यामुळे त्याचे नाव इतिहासात चिरकाल टिकणारे आहे.

**संदर्भ :**


प्रकाशवाटा – डॉ.आमटे प्रकाश – समकालीन प्रकाशन, पुणे, ७ एप्रिल २००९

रानमित्र – डॉ.आमटे प्रकाश – समकालीन प्रकाशन, पुणे, २ आक्टोबर २००९

नेगलभाग १ – मनोहर विलास – प्रकाशक ग्रंथावली,मुबई, १जानेवारी १९९१

नेगल हेमलकसाचे सांगाती भाग २ – मनोहर विलास– प्रकाशक ग्रंथावली,मुबई, ४जुलै २००३

समिधा – साधना आमटे – पॉप्युलर प्रकाशन,मुबई २००१

द रिअल हिरो डॉ प्रकाश बाबा आमटे–सोनार किरण आनंदी सहवास प्रकाशन,नाशिक४ एप्रिल २०१७

एका नक्षलवादाचा जन्म – मनोहर विलास – श्रीविद्या प्रकाशन,पुणे, १५ ऑक्टोबर १९९२

तुम्हचे आम्हचे सुपरहिरो डॉ प्रकाश आमटे–देशमुख दिपा– मनोविकास प्रकाशन,पुणे २६ जानेवारी २०१५

एका अवलियाचा प्रपंच – ठाकूर अंजली – आनंदी सहवास प्रकाशन,नाशिक ४ एप्रिल २०१७

प्रकाशमार्ग – डॉ. प्रकाश आमटे – मेनका प्रकाशन, पुणे ७ऑगस्ट २०१७